जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2020
तरुण भारत



# दूर शिक्षणचा अभ्यासक्रम आता अंध विद्यार्थ्यांसाठीही

## १३ अभ्यासक्रमांच्या पुस्तकांचे होणार श्राव्य माध्यमात रुपांतरण : सर्व समावेशी शिक्षण केंद्राचा पुढाकार

**आशिष आडिवरेकर**
कोल्हापूर

अंध विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या सर्व समावेशी शिक्षण संसाधन केंद्राने पुढाकार घेतला आहे. दूर शिक्षण विभागातंर्गत असणाऱ्या सर्व १३ अभ्यासक्रमांच्या पुस्तकांचे ऑनलाईन कन्वर्झन करण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना वाचता येत नाही त्या विद्यार्थ्यांना दूर शिक्षणचा सर्व अभ्यासक्रम श्राव्य स्वरुपात (ई कंटेंट अथवा डेसी बुक्स) मध्ये रुपांतरीत करुन देण्यात येणार आहे. संगणकावर ते विद्यार्थी हेडफोन अथवा स्पिकरद्वारे सर्व अभ्यासक्रम ऐकू शकतात.

शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालयाच्या वतीने सर्व समावेशी शिक्षण संसाधन केंद्र २०१६ मध्ये सुरु करण्यात आले आहे. डॉ. नमिता खोत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मनोहर वासवानी, संग्राम किल्लेदार काम पाहतात. या विभागामध्ये दिव्यांगांसाठी पुस्तके, संगणक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. प्रत्येक वर्षी या विभागामध्ये २०० हून अधिक विद्यार्थी प्रवेश नोंदवितात. विद्यापीठाचे विद्यार्थी नसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. अंध विद्यार्थ्यांसाठी या विभागाच्या वतीने ५९० पुस्तकांचे ब्रेललिपीमध्ये रुपांतरण तर ३१२ पुस्तकांचे ऑडीओ रुपांतरण केले आहे. केंद्राकडून दूर शिक्षण विभागातील सर्व अभ्यासक्रांच्या सर्व पुस्तकांच्या सॉफ्ट कॉपी घेण्याचे काम सुरु आहे. या सॉफ्ट कॉपीचा सॉफ्टरवेअरच्या माध्यमातून डेसी (डिजीटल ॲक्सेसीबल इनफॉरमेशन सिस्टीम सॉफ्टवेअर) फॉर्मेटमध्ये रुपांतरण केले जाणार आहे. यानंतर अंध विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच संगणकावर ही सर्व पुस्तके ऐकता येणार आहेत.

### दूर शिक्षण अंतर्गत येणारे अभ्यासक्रम....

१) बी. ए.
२) बी. कॉम
३) एम. ए इकॉनॉमिक्स
४) एम. ए. हिस्ट्री
५) एम. ए. पॉलिटीकल सायन्स
६) एम. ए. मराठी
७) एम. ए. सोशालॉजी
८) एम. ए. इंग्लीश
९) एम. ए. हिंदी
१०) एम. कॉम. वॅल्यूएशन ऑफ रिअल इस्टेट
११) एम. कॉम., १२) एमबीए
१३) पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन



### मोबाईल, संगणक वापराबाबत कार्यशाळा

सर्व समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या वतीने अंध विद्यार्थ्यांसाठी वर्षातून २ वेळा वर्कशॉपचे आयोजन केले जाते. अंध विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर, मोबाईल कसे हाताळायचे याचे प्रशिक्षण दिले जाते. यामुळे विद्यार्थी कॉम्प्युटर, मोबाईल वापरण्यामध्ये कौशल्या प्राप्त करतात. याचाच उपयोग ते रोजगारासाठी करु शकतात.

### पुस्तक रुपांतरणाचे काम सुरु

या उपक्रमामुळे दूरशिक्षण विभागाचे सर्व अभ्यासक्रम अंध विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पाची संकल्पना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासमोर सादर केल्यानंतर त्यांनी तत्काळ या प्रकल्पास मंजूरी देऊन २ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. यामुळे अंध विद्यार्थ्यांना दुर शिक्षण विभागातील सर्व अभ्यासक्रमांचा लाभ घेता येणार आहे. पुस्तकांच्या रुपांतरणाचे करण्याचे काम सुरु करण्यात आले.

**डॉ. नमिता खोत, संचालिका**
**समावेशी शिक्षण संसाधन केंद्र**

# कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन टाळावे

## डॉ. व्ही. ए. रानडे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचे संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन करणे, गर्दीच्या ठिकाणी जाणे, प्रवास करणे टाळावे. साबणाच्या पाण्याने हात स्वच्छ धुवून घ्यावेत. कार्यालयीन कामाची ठिकाणे नेहमी स्वच्छ व सुरक्षित राहतील यासाठी दक्ष असले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी केले.

विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामार्फत 'कोरोना विषाणू आजारासंदर्भात प्रतिबंध व नियंत्रण' याबाबतची सर्वसाधारण माहिती विद्यापीठातील अधिविभागप्रमुख, अधिकारी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना होण्यासाठी शाहू सिनेट सभागृहामध्ये आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. रानडे म्हणाल्या, कोरोना विषाणू संसर्गामुळे जगभरामध्ये होणारे मृत्यूचे प्रमाण पाच टक्के आहे. रोगप्रतिकार शक्ती कमी असलेल्या लोकांमध्ये याची लागण लवकर होण्याची शक्यता असते. परंतु, कोरोनाच्या भीतीने घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. काही त्रास जाणवत असल्यास नजीकच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### सर्दी, थकव्याचा त्रास जाणवत असल्यास त्वरित उपचार करून घेऊन विश्रांती घ्यावी

दिवसातून तीन ते चार लिटर पाणी प्यावे. सर्दी झालेल्या व्यक्तींनी टिशू पेपरचा वापर करून बंद कचरापेटीत टिशू पेपर टाकावा. प्रादुर्भाव झालेल्या लोकांनी मास्कचा वापर करावा. संभाव्य धोका टाळण्यासाठी कार्यालयामध्ये बैठकीसाठी बाहेरून येणाऱ्या लोकांचा संपर्क क्रमांक नोंदवून ठेवावा. कार्यालयीन कामानिमित्त बाहेरगावी आयोजित होणाऱ्या बैठकांना सध्या तरी जाणे टाळावे. बैठकीच्या कामाची माहिती दूरध्वनीवरून घेणे योग्य होईल. शिजवलेल्या आरोग्यदायी अन्नाचे सेवन करावे.



शिवाजी विद्यापीठातून...

# काटकर यांचा शिवाजी विद्यापीठात सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात दीड हजार वृक्षांचे रोपण करून त्याचे संवर्धन करणारे ७३ वर्षीय निवृत्त प्राध्यापक भगवान काटकर यांचा सपत्निक कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यापीठातील जिजामाता बहुउद्देशीय सांस्कृतिक भवन येथे हा सोहळा पार पडला.

रस्त्यांवरील प्लास्टिक बाटल्या गोळा करून त्यामध्ये पाणी भरुन शिवाजी विद्यापीठात वृक्षांचे संवर्धन करून विद्यापीठ परिसराचा भाग नंदनवन करण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्याची बातमी बुधवारी (दि. ४) 'लोकमत'मध्ये प्रसिद्ध झाली. त्याची दखल घेऊन त्यांचा सपत्निक सत्कार शिवाजी विद्यापीठ योगवर्गात करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती काटकर म्हणाले, प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावून त्याची जोपासना करावी, केवळ वनमहोत्सव घेऊन वृक्षसंवर्धन होणार नाही.



**दीड हजार रोपांचे संवर्धन करून शिवाजी विद्यापीठाच्या सौंदर्यात भर घालणारे भगवान काटकर यांचा सपत्नीक सत्कार करताना डॉ. व्ही. एन. शिंदे. डॉ. योगेश साळे, सूरज पाटील, निवास माने, केशव हरेल, आदी उपस्थित होते.**

सत्काराने मी भारावून गेलो असून, प्रकृती साथ देईपर्यंत मी वृक्षसंवर्धनाचे काम करत राहणार आहे.

भगवान काटकर हे वृक्षांचे संवर्धन करून विद्यापीठ परिसराच्या सौंदर्यात भर घालत आहेत, यापुढे त्यांचे कार्य असेच वृद्धिंगत होत राहो, अशा शुभेच्छा विद्यापीठाचे कुलसचिव शिंदे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. योगेश साळे म्हणाले, आगळ्या-वेगळ्या अवलियाचा आदर्श इतरांनी घ्यावा. या कार्यक्रमात योगशिक्षक सूरज पाटील, व्यवस्थापक निवास माने, वसंत जाधव, राहुल माने, केशव हरेल, आदींनी गौरवपर भाषण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 MAR 2020

तरुण भारत

# हस्तांदोलन टाळा

कोल्हापूर : कोरोना विषाणूचे संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन करणे, मिठी मारणे, गर्दीच्या ठिकाणी जाणे, प्रवास करणे टाळावे. कार्यालयीन कामाची ठिकाणे स्वच्छ व सुरक्षित राहतील यासाठी दक्ष असले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी केले.

**डॉ. व्ही. ए. रानडे: विद्यापीठात कोरोनावर कार्यशाळा**

विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामार्फत 'कोरोना विषाणू आजारासंदर्भात प्रतिबंध व नियंत्रण' याबाबतची माहिती होण्यासाठी शाहू सिनेट सभागृहामध्ये कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी डॉ. रानडे बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

डॉ. रानडे पुढे म्हणाल्या, कोरोना विषाणू संसर्गामुळे जगभरामध्ये होणारे मृत्यूचे प्रमाण पाच टक्के आहे. रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या लोकांमध्ये याची लागण लवकर होण्याची शक्यता असते. कोरोनाच्या भीतीने घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. त्रास जाणवत असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. दिवसातून तीन ते चार लिटर पाणी पिणे आवश्यक आहे. गृहिणींनी स्वयंपाक करताना वारंवार हात धुतले पाहिजेत. कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी कार्यालयामध्ये तीन ते चार वेळेस हात धुतले पाहिजे. प्रादुर्भाव झालेल्या लोकांनी मास्कचा वापर करणे गरजेचे आहे. कार्यालयीन कामांनिमित्त बाहेरगावी आयोजित होणाऱ्या बैठकांना सध्या तरी जाणे टाळावे, असेही त्यांनी पुढे सांगितले.

■ **समारोप** : शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र विभागाच्या कार्यशाळेचा समारोप. स्थळ : शिवाजी विद्यापीठ. वेळ : दुपारी ४ वाजता.

# रसायनशास्त्राच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक शक्य

## प्रा. डॉ. दिलीप ढवळे : राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ के. एम. गरडकर, प्रा. डॉ. दिलीप ढवळे, प्रा. डॉ. प्रमोद पाटील, प्रा. डॉ. जी. एस. गोकावी, प्रा. डॉ. एस. पी. हांगिरीकर.**

कोल्हापूर, ता. ६ : समाजातील विविध समस्यांवर रसायनशास्त्र व मटेरियल सायन्स यांनी एकत्र येऊन काम केले, तर समस्यांचे निराकरण सहज करता येईल, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. दिलीप ढवळे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात आयोजित 'इमरजिंग ट्रेण्डस इन केमिकल अँण्ड मटेरियल सायन्सेस' विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये परिषदेचे आयोजन केले आहे. प्रा. ढवळे म्हणाले, 'प्लास्टीकचा वापर टाळून पर्यावरणपूरक गोष्टींचा अंगीकार करणे आवश्यक आहे. जेणेकरून आपले पर्यावरण स्वच्छ व सुंदर राहील.'

अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'प्लास्टिकचा शोध लागल्यानंतर त्याचा वापर देखील दैनंदिन जीवनात सहज सुरू झाला. पण त्याच्या वापरात अतिरेक झाल्यामुळे अनेक समस्या उद्भवल्या आहेत. त्यामुळे आपण पर्यावरणपूरक संशोधन करणे शास्त्रज्ञांचे ध्येय असले पाहिजे.

विभागप्रमुख प्रा. डॉ जी. एस. गोकावी यांनी विभागात चालणारे संशोधन आणि त्याचे समाजाला होणारे उपयोग याचे महत्त्व विशारद केले. डॉ. एस. एन. तायडे, प्रा. डॉ. राहुल माने उपस्थित होते.

समन्वयक प्रा. डॉ. के. एम. गरडकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. डॉ. एस. पी. हांगिरीकर यांनी आभार मानले.

दोनदिवसीय परिषदेत दोनशेहून अधिक संशोधक सहभागी झाले आहेत. शंभरहून अधिक संशोधकांनी रसायनशास्त्रातील विविध विषयांवर भित्तीपत्रकाद्वारे त्याच्या संशोधनाची मांडणी केली. परिषदेत भरतातील विविध संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ मान्यवर तज्ज्ञ प्राध्यापक, रसायन शास्त्राशी संबंधित ग्रीन केमिस्ट्री, नॅनो टेक्नॉलॉजी, पर्यावरण शास्त्र, औषध निर्माण शास्त्र, पॉलिमर सायन्स, बायो टेक्नालॉजी विषयांवर संशोधकांचे शोधनिबंध सादर झाले.

# विद्यार्थ्यांनी कौशल्य विकसित करणे काळाची गरज : डॉ. उढाण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिकीकरण व स्पर्धेच्या काळात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये एकापेक्षा अधिक कौशल्ये विकसित करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिक्षण व सामाजिक विषयाचे अभ्यासक डॉ. उल्हास उढाण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता केंद्राच्या वतीने 'कौशल्य विकास आणि करिअर' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी व्यवस्थापनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. एच. एम. ठकार होते.

यावेळी कौशल्य विभागाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, अॅड. तुषार पाटील, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.